# ठाणेनगर वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना


महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

**पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर**
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ 209 /२०२४ दि. १८/१०/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी, ठाणेनगर** वाहतूक उप विभागाचे हद्दीत दि. २१/१०/२०२४ रोजी सकाळी ०८.०० वाजता स्वर्गीय निर्मलादेवी चिंतामण दिघे उद्यान, ठाणे येथे **पोलीस स्मृतिदिन** साजरा होणार आहे. सदर कार्यक्रम संपेपर्यंत ठाणे पोलीस स्कूल ते शासकिय विश्रामगृह, ठाणे पर्यंत रोड वाहतुकीकरीता बंद करावा लागणार आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होवू नये, वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी**, मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर,** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम.व्ही.ए–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकोराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) पोलीस स्कूल, खारकर आळी कडून कोर्टनाक्याकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **पोलीस स्कूल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने पोलीस स्कूल चौकातून महाजनवाडी हॉल मार्गे एन.के.टी. कॉलेज कडे अथवा चित्रे टॉवर, जांभळी नाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) कोर्ट नाक्याकडून पोलीस स्कूल मार्गे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **शासकिय विश्रामगृह, ठाणे** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने एन.के.टी. कॉलेज कडून महाजनवाडी हॉल मार्गे व पॅव्हिलीयन हॉटेल, ठाणे मध्यवर्ती कारागृह मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना दि. २१/१०/२०२४ रोजी सकाळी ०६.०० वा. ते पोलीस स्मृतिदिन कार्यक्रम संपेपर्यंत अंमलात राहील.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचना राजपत्रात प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे

**प्रत माहितीसाठी**
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ठाणे
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे
पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे
विभाग नियंत्रण, राज्य परिवहन, ठाणे
नियंत्रण कक्ष, ठाणे शहर

CamScanner

# THANENAGAR TRAFFIC UNIT

